नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ६७ Issue - 67 | वार गुरुवार दि. २४ जुलै २०२५ Blow- Thursday Date 24 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संत नामदेव महाराज मंदिराचा जिर्णोद्धार करणार : मुख्यमंत्री फडणवीस

## संत नामदेव महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/पंढरपूर : समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्यधारेत आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येईल आणि संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार हे त्यांचे खरे स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

पंढरपूर येथे आयोजित श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठ शतकोत्तर संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, श्री नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गुरु गोविंदसिंग, संत कबीर यांनी संत नामदेवांचा उल्लेख अत्यंत आदराने केला आहे. मीराबाई, नरसिंह मेहता यांच्या काव्यातदेखील नामदेव महाराजांचे विचार पहायला मिळतात. भारताच्या सर्व दिशांना जोडण्याचे आणि खऱ्या अर्थाने भागवत धर्मातील विचार वैश्विक करण्याचे कार्य त्यांनी केले. आपला पारंपरिक व्यवसाय जरी त्यांनी केला नसला सामाजिक समरसतेचे वस्त्र विणण्याचे, संपूर्ण व्यवस्था बदलण्याचे आणि समाजाला एकतेचे मूल्य देण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. संत कबीर, दादू, गरीबदास यांनी विचारांची प्रेरणा संत नामदेवांकडून घेतली. आपल्या संतभूमीत अभंगांच्या माध्यमातून संतांचा हा विचार आपल्यापर्यंत पोहोचला आहे.



भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे संत नामदेवांचे महान कार्य

संत नामदेव महाराजानी देशातील २२ राज्यात भ्रमण करून भागवत धर्माचा विचार पोहोचविला. परकीय आक्रमणाच्यावेळी समाजात श्रद्धा निर्माण करण्याचे आणि समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेची गंगा मराठीत आणली, त्याला नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले. या दोघा संतांची भेट वारकरी संप्रदायात अमूल्य विचारांचा संगम म्हणून पाहिले जाते.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई महाराज यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा संपन्न**

संत नामदेव केवळ वारकरी नव्हते, तर भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे पाईक होते. त्यांनी भाषेचे बंधन झुगारले, सीमांची कुंपणे तोडली आणि भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे कार्य केले. आपल्या ऐतिहासिक यात्रेचा समारोप पंढरपूरला करतांना स्नेहभोजनात सर्वांना एकत्र करून संपूर्ण समाजाला एक करण्याचे कार्य केले. विठ्ठल मंदिरात चोखोबाची समाधी उभी करून विखंडीत समाजाला समाजात जन्माने नव्हे तर कर्माने व्यक्ती मोठा होतो हा संदेश दिला.

हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे महान कार्य

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीचे हृदयद्रावक दृष्य घटनेचे वर्णन केले. त्यांनी पुंडलीकांपासून जनबाईपर्यंत भक्तांचे चरित्रदेखील लिहिले. आपल्या इतिहासातले पहिले चरित्रलेखक संत नामदेव महाराज होते. त्यांच्या साहित्यात संवाद आहे, नाट्य आहे, अखिल मानवतेचा विचार करून निर्माण केलेले हे साहित्य आहे. श्रीकृष्णाच्या लीला मराठीत सांगतांना त्यांनी बालकविताही त्यांनी लिहिल्या आहे. मराठच्या गजलांचे मूळही संत नामदेवांपर्यंत पोहोचतं. सर्व साहित्याची निर्मिती करतांना हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी हिंदी आणि पंजाबीत अभंग लिहिले. ब्रज भाषा आणि शौरसेनी भाषा त्यांना अवगत होत्या. भाषा हे संवादाचे साधन आहे, विवादाचे साधन नाही, हे त्यांनी दाखवून दिले. भाषा ही मैत्री आणि बंधुत्वाचा धागा आहे हे त्यांनी जाणून घेतले होते. म्हणून शीख धर्मात सर्वोच्च स्थानी असलेल्या गुरू ग्रंथसाहीबमध्ये ६१ पदे संत नामदेवांची आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

नामदेव पायरीचे दर्शन हा भाग्याचा क्षण

संत नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधीच्या निमित्ताने नामदेव पायरीचे दर्शन घेणे आणि तिथली ऊर्जा प्राप्त करून घेणे हा भाग्याचा दिवस असल्याचे नमूद करून श्री.फडणवीस म्हणाले, या पायरीच्या दर्शनाने प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घेतल्याचे पुण्य मिळते. नामदेव महाराजांच्या अभंगात 'पायरिचे चिरे' असा उल्लेख आहे, त्यानी याच भावनेने आपले कार्य केले. भागवत धर्माचा विचार हा वैश्विक विचार आहे, तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचे कार्य नामदेव महाराजांनी केले. मराठ्यांनी हिंदवी स्वराज्य अटकेपार नेले, परंतु त्यापूर्वी नामदेव महाराजांनी भागवत धर्माचा विचार तिथपर्यंत पोहोचविला. त्यांच्या कुटुंबानेदेखील विठुमाऊलीचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचविले. एकाच परिवारातल्या सदस्यांनी एकाचवेळी संजीवन समाधी घेण्याची घटना केवळ भागवत धर्मात आणि विठ्ठलाच्या भक्तीतच शक्य आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

संत नामदेव परिसर विकासाचे प्रयत्न-पालकमंत्री जयकुमार गोरे

पालकमंत्री श्री.गोरे म्हणाले, देशाची संस्कृती जपणे, वृद्धींगत करणे, संताच्या विचाराचा प्रसार होणे, आपली प्रेरणास्थळे बळकट करण्यासाठी शासन कार्य करीत आहे. पंढरपूरचा विकास होऊन भव्य कॉरीडॉरची निर्मिती करण्यासाठी नागरिकांना विश्वासात घेण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रयत्न आहे. नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी भव्य स्मारक पंढरपूर येथे उभे रहावे आणि संत नामदेव महाराज मंदिर परिसराचा विकास व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संत शिरोमणी सावता महाराजांच्या स्मारकासाठी १५० कोटींचा निधी देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने नुकताच घेतल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील लोकांनी परस्परांमधील लहान- मोठे मतभेद बाजूला ठेवून संत नामदेव महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी एकत्रित यावे असे आवाहन श्री.गोरे यांनी केले. (पान २ वर..)

# मुंबई, ठाणे, पालघरला आज मुसळधार; कोकण, घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : मुंबई, ठाण्यासह कोकणात दोन दिवसांपासून सरी बरसत आहेत. पावसाचा जोर गुरुवारीदेखील कायम असेल. या दरम्यान कोकणात व सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पावसाचा रेड अॅलर्ट घोषित केला आहे. तर मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यांना ऑरेंज लर्ट देण्यात आला आहे.


बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. त्याचा मोठा प्रभाव प्रामुख्याने कोकण, मध्य महाराष्ट्र व घाटमाथ्यांवर दिसून येत आहे. यामुळेच कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी गुरुवारी रेड अलर्ट असेल. त्याचवेळी मुंबईसह ठाण्यातही ऑरेंज लर्ट देण्यात आला आहे, अशी माहिती प्रादेशिक हवामान विभाग प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली. पूर्व विदर्भात २५-२६ जुलैदरम्यान धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरात दरड कोसळणे, पुराची स्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

मुंबईतील समुद्राला २४ जुलै ते २७ जुलै या कालावधीत सलग चार दिवस मोठी भरती येणार आहे. २६ जुलैला सर्वांत मोठी, म्हणजेच ४.६७ मीटर उंचीची भरती येणार आहे. भरतीकाळात समुद्रकिनारी जाऊ नये, असे आवाहन मुंबई महापालिकेने केले आहे. गुरुवारी सकाळी ११.५७ वाजता ४.५७ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. शुक्रवारी दुपारी १२.४० वाजता ४.६६ मीटर, २६ जुलैला दुपारी १.२० वाजता ४.६७ मीटर आणि रविवारी दुपारी १.५६ वाजता ४.६० मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. मुंबईत मुसळधार पाऊस पडला आणि त्याचवेळी समुद्राला मोठी भरती असेल तर ठिकठिकाणी पाणी साचण्याची शक्यता आहे. या चार दिवसांत भरतीवेळी समुद्राच्या लाटा ४.५० मीटर उंचीपेक्षाही जास्त उसळणार आहेत.

# पंढरपुरातील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिराला गळती

**बेजबाबदार प्रशासकीय अधिकारी आणि ठेकेदारावर कारवाई करा : गणेश अंकुशराव**





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी): पंढरपुरातील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिराला गळती लागली असून आज दुपारी झालेल्या पावसात मंदिराच्या छताला गळती लागल्याचं दिसून आले आहे. मंदिराच्या संवर्धनाचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाले असुन बेजबाबदार प्रशासकीय अधिकारी व संबंधित ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी अन्यथा आंदोलन करू. असा इशारा महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी केली आहे.

आज गणेश अंकुशराव हे मंदिरात दर्शनासाठी गेले असताना संपुर्ण मंदिर गळत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यावेळी त्यांनी या घटनेचे छायाचित्रे काढली, व्हिडिओ काढले असुन मंदिर समिती च्या मंदिर संवर्धनाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे दाखवून दिले.

हजारो वर्षांपासून चे पुरातन श्रीविठ्ठल मंदिर असे पावसाळ्यात गळत असल्याचे कधी दिसले नाही, परंतु मंदिराचे संवर्धनाचे काम झाल्यानंतर असे विदारक चित्र दिसुन येत आहे, या संपूर्ण कामात खुप मोठा भ्रष्ट कारभार झालेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही, आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंदिरात आले होते त्यांनी सुध्दा मंदिर संवर्धनाचे कामकाजाची पाहणी करायला हवी होती, परंतु तसे घडले नाही, मंदिर समिती प्रशासनाकडून या कामात मोठा घोटाळा झाला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही, त्यामुळे शासनाने संबंधित बेजबाबदार प्रशासकीय अधिकारी व ठेकेदारांची व या कामाची सखोल चौकशी करावी अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करू. असा इशारा यावेळी गणेश अंकुशराव यांनी दिला आहे.

**पायलट 'मेडे' ओरडला**

**अहमदाबादमध्ये पुन्हा थरार**

# टेकऑफआधी विमानाच्या इंजिनाला आग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अहमदाबादहून दिवला निघालेल्या इंडिगोच्या एटीआर७६ विमानाच्या इंजिनाला आग लागल्याची घटना घडली. ही घटना आज सकाळी ११ च्या सुमारास विमानानं उड्डाण करण्यापूर्वी घडली. विमानात ६० प्रवासी होते. विमान धावपट्टीवर उड्डाणाची तयारी करत असताना पायलटनं हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला इमर्जन्सी मेडे कॉल पाठवला आणि उड्डाण थांबवलं.

विमानाच्या इंजिनाला आग लागल्यानंतर सगळ्या प्रवाशांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आलं. फ्लाईट रद्द करण्यात आलं. विमानात तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती मिळताच फ्लाईट रद्द करण्यात आल्याचं इंडिगोकडून सांगण्यात आलं आहे. सकाळी ११ वाजता विमानानं उड्डाण करणं अपेक्षित होतं.




हवाई वाहतूक नियंत्रण कक्षानं हिरवा झेंडा दिल्यावर विमान धावपट्टीवर आलं. विमानानं रोलिंग सुरु केलं. रोलिंगनंतर विमान टेकऑफ घेतं. मात्र तितक्यात विमानाच्या इंजिनाला आग लागली आणि पायलटनं हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाला मेडे कॉल दिला. यानंतर विमान घाईघाईत रिकामं करण्यात आलं. इंडिगोच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजरचं पालन करुन पायलटनं अधिकाऱ्यांना माहिती दिली आणि विमान पुन्हा बेमध्ये आणलं. विमानाच्या उड्डाणाआधी सगळ्या आवश्यक चाचण्या करण्यात आलेल्या होत्या. विमानाची देखभाल, दुरुस्ती व्यवस्थित केली गेली होती. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल इंडिगो एअरलाईन्सनं खेद व्यक्त केला. प्रवाशांना नाश्ता उपलब्ध करुन देत त्यांच्यासाठी अन्य विमानाची सोय आणि पूर्ण रिफंड असे दोन पर्याय दिले. याआधी सोमवारी गोव्याहून इंदूरला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात लँडिंगआधी तांत्रिक समस्या निर्माण झाली होती. पण सुदैवानं विमानानं सुरक्षित लँडिंग केलं.

याआधी गेल्या महिन्यात अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या बोईंग ड्रीम लायनरल ७८७ विमानाला भीषण अपघात झाला. त्यामध्ये विमानातील २४२ पैकी २४१ जणांचा जीव गेला. लंडनला निघालेलं विमान उड्डाणानंतर अवघ्या काही सेकंदांनंतर एका मेडिकल हॉस्टेलच्या इमारतीवर कोसळलं. त्यावेळी हॉस्टेलमधील विद्यार्थी जेवत होते. या दुर्घटनेत एकूण २६० जण मृत्यूमुखी पडले. तेव्हापासून विमानात तांत्रिक बिघाड झाल्याच्या घटना सातत्यानं समोर येत आहेत.

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील**

# राज्यात 'विद्यार्थी सहाय्यता केंद्र' स्थापन करणार

**संगणक केंद्रे व प्रवेश मार्गदर्शनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत सुलभता व पारदर्शकता मिळावी, तसेच आवश्यक मार्गदर्शन मिळावे यासाठी 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, तसेच तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर हे मान्यवर उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, राज्यातील विद्यार्थ्यांना तांत्रिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत सहकार्य करण्यासाठी संगणक सुविधांसह सुसज्ज अशी 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' स्थापन करण्यात येत आहेत. ही केंद्रे विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची तपासणी, समुपदेशन आणि मार्गदर्शन याबाबत मदत करतील.

प्रत्येक जिल्ह्यातील दोन नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ही 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रे' कार्यान्वित केली जाणार आहेत. प्रवेश प्रक्रियेची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक सहाय्यता देणे, तसेच विविध शंका निरसन करणे ही केंद्रांची प्रमुख भूमिका असेल.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू होणाऱ्या विविध व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत या केंद्रांची मदत होईल, असेही श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



संपादकीय....

## एकात्मतेचे पाईक

संत नामदेव महाराजानी देशातील २२ राज्यात भ्रमण करून भागवत धर्माचा विचार पोहोचविला. परकीय आक्रमणाच्यावेळी समाजात श्रद्धा निर्माण करण्याचे आणि समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेची गंगा मराठीत आणली, त्याला नामदेव महाराजांच्या तत्वज्ञानाचे अधिष्ठान लाभले. या दोघा संतांची भेट वारकरी संप्रदायात अमूल्य विचारांचा संगम म्हणून पाहिले जाते. संत नामदेव केवळ वारकरी नव्हते, तर भारतीय संस्कृतीच्या एकात्मतेचे पाईक होते. त्यांनी भाषेचे बंधन झुगारले, सीमांची कुंपणे तोडली आणि भक्तीचा ओघ संपूर्ण भारतात नेण्याचे कार्य केले. आपल्या ऐतिहासिक यात्रेचा समारोप पंढरपूरला करतांना स्नेहभोजनात सर्वांना एकत्र करून संपूर्ण समाजाला एक करण्याचे कार्य केले. विठ्ठल मंदिरात चोखोबाची समाधी उभी करून विखंडीत समाजाला समाजात जन्माने नव्हे तर कर्माने व्यक्ती मोठा होतो हा संदेश दिला. मराठच्या गजलांचे मूळही संत नामदेवांपर्यंत पोहोचतं. सर्व साहित्याची निर्मिती करतांना हिंदी साहित्याला नवे भान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी हिंदी आणि पंजाबीत अभंग लिहिले. ब्रज भाषा आणि शौरसेनी भाषा त्यांना अवगत होत्या. भाषा हे संवादाचे साधन आहे, विवादाचे साधन नाही, हे त्यांनी दाखवून दिले. भाषा ही मैत्री आणि बंधुत्वाचा धागा आहे हे त्यांनी जाणून घेतले होते. म्हणून शीख धर्मात सर्वोच्च स्थानी असलेल्या गुरू ग्रंथसाहीबमध्ये ६१ पदे संत नामदेवांची आहेत. दरम्यान श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठ शतकोत्तर संजीवन समाधी सोहळ्यात मुख्यमंत्र्यांनी समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्यधारेत आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी व वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात येईल आणि संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचे स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. त्यांचे विचार हे त्यांचे खरे स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येईल.

## संत नामदेव महाराज मंदिराचा जिर्णोद्धार करणार : मुख्यमंत्री फडणवीस

(पान १ वरून..) यावेळी हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व आचार्य तुषार भोसले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सरसंघचालक मोहन भागवत यांनी या कार्यक्रमासाठी दिलेला शुभेच्छा संदेश दाखवण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री महोदयांनी श्री संत शिरोमणी तुकाराम महाराज यांच्या परिवारातील त्यांचे वंशज हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर महाराज नामदास व अन्य संतांचे पद पूजन केले. त्यानंतर श्री संत नामदेव महाराज यांच्या संपूर्ण कार्याची माहिती व महिमा लोकांपर्यंत पोहोचावा यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष संकेतस्थळांचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, तसेच या संजीवन सोहळ्यानिमित्त तयार करण्यात आलेल्या चांदीच्या विशेष नाण्याचे विमोचन ही करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री नामदेव क्षत्रिय एकसंघचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश ढवळे यांनी केले.

कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार राजेंद्र राऊत, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, आचार्य तुषार भोसले, अभिनेता गोविंदजी नामदेव, ह.भ.प. केशव महाराज नामदास, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, एकसंघचे अध्यक्ष महेश ढवळे, सचिव रुपेश खांडके व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# जखमा वंचितांच्या.....भरून येतील काय?

आत्मकथने वा आत्मचरित्रे ही वय, अनुभव व लेखकसापेक्ष असतात. वय जसजसे वाढेल तशी परिपक्वता वाढते. विचारांचीही परिपक्वता अधिक गंभीर होत जाते. जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टीकोन सकारात्मक व पारदर्शी बनतो. जास्त आपल्या विषयी सांगावेसे व लिहावे असे वाटते. प्रत्येक वेळी मानवी मुल्यांची काळाच्या संदर्भात नव्याने मांडणी व फेरमांडणी करावी लागते. आत्मकथने, आत्मचरित्रे व स्वकथने अनेक प्रकाशित झाली. दया पवारांचे 'बलुतं' , प्र.ई. सोनकांबळेचे 'आठवणीचे पक्षी', शंकरराव खरातांचे ' तराळ-अंतराळ' शरणकुमार लिंबाळेचें 'आक्करमाशी', बेबीताईचे 'माज्या जल्माची चित्तरकथा' , नरेद्रं जाधवांचे 'आम्ही आणि आमचा बाप' अशी आत्मकथने गाजली. म्हणून आपण लिहू नये असे नाही. आत्मशोध जीवन जगण्याच बळ निर्माण करतो. जीवनाकडे विवेकाने पाहायला शिकवतो. फुले शाहू आंबेडकर चळवळीत कार्यरत असताना. वैचारिक सशक्तीकरण आवश्यक आहे. आंबेडकरांच्या संपूर्ण तत्वज्ञानाची मांडणी माणूस हेच केद्रं होते. लिहिण्यासाठी अफाट वाचन, चिंतन, मनन, अभ्यास व साहित्य प्रकाराचा अभ्यास करावा लागतो. अनुभव व वैचारिक चिंतनाची बैठक पक्की व्हायला लागते. आपले लेखन इतरांना जीवनोपयोगी पडावे. यासाठी सकारात्मकता व दिशा स्पष्ट व्हावी हा हेतू असतो. माणूस क्षणाक्षणाला बदलू शकतो. नवा माणूस निर्माण होवू शकतो. यासाठी निसर्ग आणि माणूस, समाज आणि माणूस, माणूस आणि तो स्वतः याचे कार्यकारणभाव समजून घेऊन निरिक्षणे नोंदवावी लागतात. वयाबरोबर विचारशक्ती वाढत असते. कारणाशिवाय तणाव निर्माण होत असतात. पाण्याचा नळ नुसताच वाहाता राहिला तर आपण तो बंद करतो. गरज असेल तेव्हा आपण लाईट लावतो. बॅटरी बंद ठेवतो. परंतू विचारांची बॅटरी आपण बंद करू शकत नाही. ती सुरूच असते. आंबेडकरी जाणिवा प्रगल्भ झाल्याने विचार थांबून मनाला विंश्राती देणे जमत नाही. अस्वस्थता असते.

शेतक-याच्यां आत्महत्या, महापूरासारखी संकटे, जात-धर्माच्या नावाखाली होणा-या कत्तली पाहून जीव कासावीस होतो. धर्म, जात, प्रदेश, भाषा, हक्क व अधिकार, अस्तित्व इत्यादी मानवी मूल्यांचं हरण करून एक वेगळा दहशतवाद आपल्या देशात व जगात थैमान घातले आहे. समाजातील वाढती असहिष्णूता, धार्मिक ध्रुवीकरण, मॉब लिंचिग, संविधान वाचवण्यासाठी अनेक संघटनांची मोर्चे, ईव्हीएम हटावचे आंदोलने, लोकशाही विरूद्ध एकाधिकारशाही......सारख्या घटनांमुळे अस्वस्थ होते. असे वाटते की मानवी जीवनात काहीच चांगले नाही काय ? दुस-या बाजूला थोरपुरूषांच्या जीवनचरित्राकडे पाहिले की वाटते आपणासही जमायला हवे. माणूसपणावर श्रद्धा ठेवून आपली निरिक्षणे नोंदविणे वाईट नाही. जीवनातील अनुभवाना अनेक पैलू असतात. मानवी आक्रोश, भुक, गरीबी, अन्याय, अज्ञान, अत्याचार ही कवेत घेण्यासारखी बाब नाही. माणसांची धडपड, जीवघेणी स्पर्धा चालू आहे. जगायचे कसे ? वंचितांचे काय होणार ? त्यातून घराणेशाही, लाचारी, विश्वासघात, भ्रष्टाचार, झुंडशाही, अशा समाज विघातक विकृती दिसू लागतात. तेव्हा समाज नीतिभ्रष्टतेकडे चालला आहे की काय या संमभ्रमात मती गुंग होते. उरतात ते फक्त शब्द. शेवटी मानवता व माणसांची नैतिक कर्तव्य हीच एकविसाव्या शतकाची मागणी आहे. असे वाटते.

तथापि, समाज, संस्कृती आणि साहित्य हे परस्परांवलबी घटक आहेत.

जगताना आंबेडकरी विचार व धम्म संस्काराने खूप काही दिले. विचाराने झालेली जागृती, त्यातून मिळालेली संधी, अनुभवाच्या नोदीं करत आपण कोठे होतो व कुठे आलो याचा आढावा. आंबेडकर विचाराने संस्कार दिला. दृष्टी दिली. दिशा दिली. आशावाद दिला. निर्भयपणे जगण्याचे बळ दिले. आंबेडकरांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या सुभाषितांने वादळातही निश्ॅलपणे उभे राहाण्याचे बळ दिले. प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष, वर्तमानाशी तडजोड आणि भवितव्याकडे निशिचत वाटचाल यातूनच 'भरती-ओहोटी व आठवणींच्या पाऊलखुणा' प्रसवले.

विशेष म्हणजे आत्मकथन लिहिणे. इतके अवघड आहे. भरती-ओहोटी लिहिताना प्रचंड वेदना झाल्या. स्वत:ला सोलून काढाव लागतं. जीवनात काय कमावले आणि काय गमावले याचा ताळेबंद द्यावा लागतो. आपली स्वच्छ भूमिक स्पष्ट करावी लागते. वास्तव जीवनापासून दूर जाता येत नाही. भरती-ओहोटीच्या वेळी कित्येकवेळा लिहून झाल्यावर ते शेवटचा ड्राफ्ट छापायला देईपर्यतं मी अक्षरशः रडायचो. इतके वेदनादायी प्रसंग, त्यातला काळ वेळ आणि व्यक्तिनिहाय वर्णनांचे संदर्भ आठवायचो. माझी मोठी बहिण इंदू व आमचे औरंगाबादचे भाऊजी बाबुराव बनसोडे यांचेशी मी नेमका काळ व नावे विचाराचो. खात्री करून घ्यायचो. आत्मचिरत्र लिहिणे सोपे नाही. एवढे खरे.

शंकरराव खरात यांचे तराळ अंतराळ मी वाचले होते. पुन्हा ती वाचायची इच्छा झाली. साहित्य जगतात 'द स्टोरी ऑफ अनटचेबल' हे आत्मचरित्र गाजले. खरात यांनी आपल्या प्रत्यक्ष जीवनातील जिवंत अनुभव जन्मापासून ते जानेवारी १९७५ चे मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू पद स्वीकारण्यापर्यंत यथार्थपणे रेखाटला आहे. वाचनीय आत्मचरित्र म्हणून तराळ अंतराळचा समावेश होतो.

अंतिमतः या सर्व आत्मकथनांचा अभ्यास केल्यावर माझे असे निदर्शनास आले आहे की, सामाजिक जाणिवा, सामाजिक परिवर्तन, सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक प्रबोधन ही मूल्ये या आत्मकथनातून व्यक्त होताना दिसतात. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी भारावलेली ही आत्मकथने वास्तव आणि भविष्याचा वेध घेताना दिसून येतात. लेखकांची निवेदन पुढच्या पिढीला दिशादर्शक करताना आढळून येतात. माणसाला हाक दिली आहे. माणूस म्हणून समानता असावी. स्वातंत्र्य, सहानुभूती, स्वाभिमान, स्वयंपूर्णता ही मूल्य प्रभावी व्हावी.ज्ञ समाज व्यवस्थेत माणसाचे अवमूल्यन होणारी व्यवस्था नसावी. कोणाचेही अवमूल्यन होणे हे सामाजिक न्यायाचे नाही. सामाजिक हिताचे नाही. अवमूल्यनामुळे सामाजिक प्रदूषण वाढते. मानवी नैतिकता अशाच कारणीभूत ठरते. यासाठी या आत्मकथनांनी मोठी आरोळी ठोकली आहे. माणसाला हाक दिली आहे. भारताची राज्यघटना ही एक देशाचे होकायंत्र आहे. ते नीट चालावे. यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय या इंधन स्थळावर उतरून ऊर्जा घेऊन ते लोक कल्याणाच्या मार्गावर चालावे. हीच अपेक्षा या आत्मकथन आणि व्यक्त केली आहे. या दृष्टीने या आत्मकथनांचा विचार व्हावा ही माफक अपेक्षा.

**संदर्भ सूची :** (१) खरात, शंकरराव; तराळ अंतराळ ; कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे; तिसरी आवृत्ती १९९६, पृष्ठे ५०३

(२) गायकवाड, दत्तात्रय; स्वयंदीप प्रकाशन, पुणे; जानेवारी २०१७; पृष्ठे १०९. (३) गायकवाड, दत्तात्रय; आठवणींच्या पाऊलखुणा; स्वयंदीप प्रकाशन, पुणे; जानेवारी २०१८. (४) खरात, शंकरराव; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहवासात; इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे; सप्टेंबर २०१९; पृष्ठे १६५.

(५) निमगडे, एन. एम. ; धुळीतून ध्येयाकडे; सुजाता प्रकाशन; नागपूर; १९९८. पृष्ठे ५९४

(६) वाघमारे, राम; सुगावा प्रकाशन, पुणे; २००९; पृष्ठे १८८.

(७) भालेराव, एस. एम.; दि ब्रिगेडियर; राजदीप प्रकाशन, पुणे; ऑक्टोबर २००९

(८) आमचा बाप आणि आम्ही : स्वरूप आणि समीक्षा; संपा. शैलेश त्रिभुवन; ग्रंथाली प्रकाशन, मुंबई; जानेवारी २००८; पृष्ठे ३०७. (९) खोब्रागडे इ. झेड.; आणखी एक पाऊल; पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१५; पृष्ठ २५६.

(१०) कांबळे, शांताबाई कृष्णाची; माज्या जल्माची चित्तरकथा; स्वभाव प्रकाशन, पुणे; तिसरी आवृत्ती १९९८, पृष्ठे १५०.

(११) गायकवाड, बी.पी. माझी संघर्षगाथा; स्वयंदीप प्रकाशन, पुणे; ऑक्टोबर २०२२; पृष्ठे १९६.

**-डॉ. दत्तात्रय गायकवाड, पुणे**
**मो. ९८६०५९१३०५**

# सर्वसामान्य जनतेसाठी लढणारे नेतृत्व म्हणजे चंद्रकांत नाना निंबाळकर



वैराग/प्रतिनिधी : १९७२ च्या दुष्काळात लोकांच्या हाताला काम मिळावे यासाठी केलेले जनआंदोलन , वैराग तालुक्याचा प्रश्न ? तसेच उजनी धरणातील पाणी वैराग भागाला मिळावे यासाठी वेळोवेळी आंदोलने करून जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवत जनतेसाठी लढणारे वैराग भागातील एकमेव नेतृत्व म्हणजे कै .चंद्रकांत नाना निंबाळकर होय .त्यांच्या १२ व्या स्मृतिदिना निमित्त त्यांच्या कर्तृत्वरूपी कार्याचा सुगंध आजही दरवळत आहे . त्यांच्या पवित्र स्मृतिस विनम्र अभिवादन .

७ जानेवारी १९३३ रोजी निंबाळकर घराण्यात चंद्रकांत नाना निंबाळकर जन्माला आले .१९५७ साली नानांनी राजकारणात प्रवेश करीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीसाठी लढा दिला . त्यासाठी तीन महिने तुरुंगवास देखील भोगला . १९६२ साली जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून येत त्यांनी राजकीय नेतृत्व सिद्ध केले .पुढे १९८० व १९९० साली मोहोळ - वैराग मतदारसंघाचे दोन वेळा आमदार म्हणून नेतृत्व केले .

दरम्यान १९७१ -७२ सालच्या पडलेल्या भीषण दुष्काळात आदरणीय नानांच्या नेतृत्वाखाली वैरागच्या शासकीय गोदामावर भव्य मोर्चा काढण्यात आला होता . त्यावेळी मोर्चावर पोलीसांनी केलेल्या बेछूट गोळीबारात आठ

जण शहीद झाले .या रक्तरंजित इतिहासामुळे रोजगार हमीचा कायदा महाराष्ट्रात निर्माण झाला .


चंद्रकांत नाना निंबाळकर यांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य शेतकरी ,शेतमजूर व कामगारांच्या प्रश्नासाठी आंदोलने करून वेचले .डाव्या विचारसरणीच्या शेतकरी कामगार पक्षाच्या मुशीत तयार झालेले नाना निंबाळकरांचे नेतृत्व १९ डिसेंबर १९९७ रोजी वैराग व भागातील जनतेच्या हिताचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी नाईलाजाने शिवसेनेत दाखल झाले . तत्कालीन शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री यांचेकडून वैराग तालुक्याचा प्रश्न मार्गी लागला नाही म्हणून पुन्हा दुसऱ्यांदा नाईलाजाने कॉंग्रेसमध्ये २००६ साली प्रवेश केला .


चंद्रकांत नाना निंबाळकरांनी आपली संपूर्ण हयात वैराग व भागातील ५७ खेड्यातील जनतेच्या हितासाठी खर्ची घातली .अनेक वेळा रास्ता रोको ,मोर्चे , आंदोलने करून सरकारला धारेवर धरले . ६ ऑगस्ट २०१३ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली .नानांच्या जाण्याने वैराग भागात निर्माण झालेली राजकीय पोकळी आज ही भरून निघालेली नाही .नानांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र वैराग भागाचे नेते संतोष निंबाळकर हे जिल्हा परिषदेचे सदस्य व वैरागचे सरपंच पद भुषवूण नानांचा राजकीय वारसा पुढे नेताना दिसत आहेत . तर नानांचे नातू युवा नेतृत्व शाहुराजे निंबाळकर हे देखील वैराग नगरपंचायतीचे नगरसेवक आहेत .

२४ ऑगस्ट २०२५ रोजी चंद्रकांत नाना निंबाळकर यांचा १२ वा स्मृतिदिन असून त्यांच्या आठवणी चा सुगंध सर्वत्र आजहि दरवळताना दिसत आहे .

**– प्रा .बलभिम लोखंडे , वैराग**

## प्रथम वर्ष डी.फार्मसी प्रवेशासाठी रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरवात





पंढरपूर/प्रतिनिधी : 'महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई म्हणजेच एम.एस.बी.टी.ई. मार्फत चालवल्या जाणाऱ्या बारावी सायन्स नंतरच्या डी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता रजिस्ट्रेशन करण्याच्या तारखा जाहीर झाल्या असून बुधवार, दि २३ जुलै २०२५ पासून ते सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५ अखेर पर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन करता येणार आहे.' अशी माहिती श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.), पंढरपूरचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे व कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी दिली.

बारावी सायन्स नंतर असलेल्या डी.फार्मसी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता रजिस्ट्रेशन करण्याच्या तारखा जाहीर झाल्या असून बुधवार, दि २३ जुलै २०२५ पासून सुरवात झाली आहे. जर प्रवेश अर्जामध्ये काही त्रुटी असतील तर दुरुस्ती दि.२९ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२५ या दरम्यान करता येईल. या प्रक्रियेनंतर दि.०३ सप्टेंबर २०२५ रोजी अंतिम गुणवत्ता यादी डीटीईच्या संकेतस्थळावर पाहता येईल. रजिस्ट्रेशन करताना विद्यार्थ्यांकडे

### २५ ऑगस्टपर्यंत करता येणार रजिस्ट्रेशन

आपल्या प्रवर्गानुसार योग्य ती कागदपत्रे असणे आवश्यक आहे. संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी.रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, प्राचार्य प्रा.सतीश मांडवे व प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या सुविधा केंद्राचे कामकाज सुरु आहे. याचा लाभ बारावी उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थ्यांना डी.फार्मसीला प्रवेश घ्यायचा आहे असे विद्यार्थी व त्यांच्या पालकांना घेता येणार आहे. या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. पंढरपूर परिसर पंचक्रोशीतील नागरिकांच्या मागणीनुसार सन २००६ साली कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.) महाविद्यालय स्थापन झाले होते. आदरयुक्त शिस्त व संस्कार यासाठी प्रसिद्ध असलेल्या या महाविद्यालयातील विद्यार्थी गुणवत्ता यादीत देखील सातत्याने आघाडीवर असल्याचे दिसून येते. त्यातून हे महाविद्यालय पहिल्याच फेरीत फुल्ल होत असल्यामुळे या महाविद्यालयातच आपल्याही पाल्याला शिक्षण घ्यावे या हेतूने पालकांच्या मागणीला जोर चढल्यामुळे यावर सारासार विचार करून चार वर्षापूर्वी (२०२१) आणखी एका डी. फार्मसी या कोर्सची सुरवात कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री) महाविद्यालयात करण्यात आली. वार्षिक परीक्षांचे निकाल, वसतिगृहाची सुविधा, रात्र अभ्यासिका आदी विद्यार्थी पूरक सुविधांमुळे पालक व विद्यार्थ्यांचा स्वेरीकडे ओढा वाढत आहे. डी. फार्मसीच्या प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रा.सौरभ कौलगी (मोबा.क्र .-९४२१५८८९२३) व डॉ.वृणाल मोरे (मोबाईल-९६६५१९६६६६) या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## भाजपाच्या वतीने नळदुर्ग येथे आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदात्यानी गाठला उच्चांक; १८३ रक्तदात्यानी केले रक्तदान






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणविस यांच्या वाढदिवसा निमित्ताने भाजपाच्या वतीने नळदुर्ग ता.तुळजापूर येथे आयोजित रक्तदान शिबिरात आतापर्यंत येथे झालेल्या रक्तदान शिबिरापेक्षा सर्वाधिक उच्चांक गाठला असून तब्बल १८३ रक्तदात्याने रक्तदान केल्याची नोंद झाली आहे.

तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यामान लोकप्रिय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणविस यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्ताने भारतिय जनता पार्टी नळदुर्ग मंडल व तुळजापूर तालुका ग्रामिण मंडलाच्या वतीने नळदुर्ग ता. तुळजापूर येथिल लोकमान्य वाचनालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजान करण्यात आले होते. सर्व श्रेष्ठ दान रक्तदान या भावनेतून नळदुर्ग व परिसरातील रक्त दात्यानी उस्पूर्त प्रतिसाद देत तब्बल १८३ रक्तदात्यानी या शिबिरात रक्त दान करून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस उर्फ देवा भाऊ याना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी भाजपा जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी,तुळजाभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुनिल चव्हाण, जिल्हा सरचिटणीस अँड. दिपक दादा अलूरे, तांडा सुधार योजनेले अशासकीय सदस्य विलास राठोड,माजी नगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार आदीनी या शिबिरास भेट देवून रक्तदात्यांचे आभिनंदन केले. भाजपा नळदुर्ग मंडल अध्यक्ष बसवराज धरणे, तुळजापूर तालूका ग्रामिण मंडल अध्यक्ष सौ.रंजनाताई विलास राठोड, भाजपाचे सुशांत भुमकर, संजय बताले,धिमाजी घुगे,साहेबराव घुगे,कल्पनाताई गायकवाड, छमाबाई राठेड, भिवाजी इंगोले, किशोर धुमाळ, उमाजी गोरे, शरणाप्पा इंगोले,महादेव सालगे,अमर नरवडे, युवराज पाटील, सचिन घोडके, दयानंद मुडके, गणेश मोरडे,श्रमिक पोतदार, विनायक अहंकारी, किशोर नळदुर्गकर,प्राविण घोडके,पद्माकर घोडके, निरंजन राठोड सह परिसरातील कार्यकर्ते यानी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. यावेळी हेडगेवार रक्त पेढी सोलापूर चे जनसंपर्क अधिकारी सुशांत कुलकर्णी, सौ.नभा घाटे, सौ. दिवा कुलकर्णी,सौ.माधुरी शिंदे,सौ.मंगल कुंभार, अक्षय पाटील, सतिश पुजारी, राजू गुजर, अरविंद कुलकर्णी, प्रतिक मडिवाळ आदीनी रक्त संकलनाचे काम चोख बजावले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाच्या निविदेबाबत प्राप्त तक्रारी व गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यू प्रकरणी चौकशीसाठी समिती गठीत : सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर

## आठ दिवसात समिती अहवाल देणार; मंदिर समितीची विशेष सभा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाच्या ई निविदे संदर्भात प्राप्त तक्रारी व गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यू प्रकरणी चौकशीसाठी ड. माधवीताई निगडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती पुढील ८ दिवसात चौकशी अहवाल देणार आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर मंदिर समितीच्या सभेत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील कार्यालयात दि. २३ जुलै रोजी सह अध्यक्ष औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस सदस्या शकुंतलाताई नडगिरे, डॉ दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ड माधवीताई निगडे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व लेखा अधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते.

दर्शनरांगेतील बॅरिकेटींग कामाच्या ई निविदे संदर्भात प्राप्त तक्रारी व गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याच्या दृष्टीने मंदिर समितीच्या सदस्या ड. माधवीताई निगडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. त्यामध्ये शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर यांचा सदस्य पदावर समावेश करण्यात आला आहे. सदरची समिती पुढील ८ दिवसात चौकशी करून मुख्य समितीसमोर अहवाल सादर करणार आहे. सदर चौकशी पूर्ण होऊन पुढील निर्णय होईपर्यंत व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे.

दर्शनरांगेतील बॅरिकेटिंग कामाच्या ई निविदे संदर्भात श्री पुरुषोत्तम सग्गम, सोलापूर यांनी आर्थिक फसवणूक झाल्याच्या तक्रारी संदर्भात समाजमाध्यमांत बातमी प्रसिध्द झाली होती व काही ऑडीओ क्लिप व्हायरल झाल्या होत्या. त्या अनुषंगाने मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री मनोज श्रोत्री यांना नोटीस बजावून खुलासा घेण्यात आला होता. तसेच गोशाळेतील नवजात वासराच्या मृत्यूबाबत देखील बातमी व व्हिडीओ समाजमाध्यमांत प्रसिध्द झाला होता. त्या अनुषंगाने देखील योगेश पाठक व तानाजी जाधव यांच्यावर पंढरपूर शहर पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी व तत्कालिन विभाग प्रमुख डॉ. प्रशांत सर्वगोड व सध्याचे विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदरच्या दोन्ही घटना मंदिर समितीने गांभीर्याने घेतल्या असून, या दोन्ही घटनांची सखोल चौकशी करुन दोषी असणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

---

# कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ हन्नूर प्रशालेत विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सर यांचा १० वा स्मृतिदिन आज हन्नूर येथे विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. सर्वप्रथम प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी सर यांच्या हस्ते कै. सरांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर या स्मृतिदिनाच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यातील लहान व मोठ्या गटातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरवण्यात आले.यावेळी वक्तृत्व स्पर्धेतील दोन्ही गटातील प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या कु. शिवानी बाळशंकर,कु.दिव्या निकम या विद्यार्थ्यिनींची भाषणे झाली.यानंतर हन्नूर प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. बसवराज बंडगर व सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.चंद्रकांत व्हनमाने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले. यानंतर प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी सर व डोंबरजवळगेचे पालक श्री.आप्पाशा पाटील यांच्या हस्ते प्रशालेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सौ. सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.अशोक दंतकाळे , अनंत चैतन्य प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार, सेवानिवृत्त शिक्षक श्री. विश्वनाथ चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे, पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी,समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सांस्कृतिक सहाय्यिका सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी तर आभार सौ. मल्लमा चप्पळगाव यांनी मानले.

---

### समाजासाठी झटणाऱ्या नेतृत्वाला मानाचा मुजरा!

# कैलास गहिनीनाथ बनसोडे यांना 'महाराष्ट्ररत्न' पुरस्काराने गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पिंपळे गुरव, पुणे - सामाजिक परिवर्तनासाठी अखंड झटणारे ह्युमन सोशल डेव्हलपमेंट असोसिएशन चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आणि श्रावस्ती बुद्ध विहार चे संस्थापक अध्यक्ष कैलास गहिनीनाथ बनसोडे यांचा प्रतिष्ठेचा 'महाराष्ट्ररत्न' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

हा पुरस्कार युवा महाराष्ट्र फाउंडेशन आणि आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. राज्यभरातील सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये ही एक गौरवाची बाब मानली जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित, उपेक्षित, गरीब, मागास व बौद्ध समाजासाठी झटणाऱ्या बनसोडे यांच्या कार्याला या पुरस्कारामुळे अधिक व्यापक मान्यता मिळाली आहे. त्यांनी शिक्षण, आरोग्य, सामाजिक समता, बौद्ध विचारांचे प्रसार, महिला सक्षमीकरण आणि युवक विकासासाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर श्री. बनसोडे म्हणाले, हा सन्मान केवळ माझा नाही - तो प्रत्येक गरजूंसाठी, वंचितासाठी, व समाज बदलासाठी एकत्र झटणाऱ्या कार्यकर्त्यांचा आहे. हा पुरस्कार माझ्या कार्याची थांबलेली पावले चालायला लावणारा प्रेरणास्रोत आहे. या सन्मानामुळे पुणे शहरासह राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, अनेक सामाजिक संस्था, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. 'महाराष्ट्ररत्न' हा पुरस्कार सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांसाठी झटणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. कैलास बनसोडे यांनी हा सन्मान मिळवून समाजसेवेच्या क्षेत्रात एक प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे.

---

### फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

# लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच लाभतील, पण लोकशाही मेली तर विनाश अटळ आहे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच लाभतील, पण लोकशाही मेली तर विनाश अटळ आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाचा८३ वा वर्धापन दिन, अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन व भारतरत्न नेल्सन मंडेला यांच्या जयंतीनिमित्त १२२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा २० जुलै २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स समोर स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने बहिष्कृत वर्गाच्या अनुषंगाने समस्या मांडल्यावर त्यांनी मजूर पक्षाच्या वतीने ते मांडता येणार नाही. त्यासाठी तशा वर्गाच्या एखाद्या संघटनेमार्फत मांडलेले योग्य राहील, असे मत व्यक्त केले होते. त्यामुळे निर्माण झालेल्या तत्कालीन परिस्थितीत बहिष्कृत वर्गाच्या नवीन संघटनेच्या निर्माण कार्यासाठी अधिवेशन बोलावणे भाग पडले होते. त्यामुळे १८ ते २० जुलै १९४२ ला नागपूर येथील मोहन पार्क येथे अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. संबंधित परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पूर्वीच निवड झाली होती. परंतु ९ जुलै १९४२ च्या व्हाईसरॉयच्या हुकूमान्वये मंत्रिमंडळात समावेश झाल्याने त्यांना अध्यक्षस्थान भूषविता आले नाही. ज्यात मद्रास लॉ कॉलेजचे प्रोफेसर एम एल ए एन शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित वर्ग परिषद, अमरावती येथील सुलोचनाताई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महिला दलित वर्ग परिषद व पंजाबचे एच बी ई एमएलए गोपाळ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समता सैनिक दलाची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत क्रिप्स योजना अस्पृश्यांना मान्य नाही, घटना परिषद लवकर भरविण्यात यावी, अस्पृश्याच्या संरक्षणासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. अस्पृश्यांना सरकारी जमिनी देऊन निवासी वसाहती निर्माण कराव्यात. दि ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनला मध्यवर्ती राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात यावी. असे ठराव संमत करण्यात आले होते.

स्ट्रॅफोर्ड क्रिप्स मिशनच्या अहवालावर बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अखिल भारतीय अनुसूचित जातीतर्फे सर्वमान्य व सुसंघटित अशी चळवळ करणे आवश्यक असून ज्या अंतर्गत ही सार्वत्रिक चळवळच राजकीय विनाशापासून वाचवू शकेल. अस्पृश्य लोक हे हिंदूचा एक विभाग अथवा उपविभाग उपविभाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवनातील तो एक स्वतंत्र आणि ठळक घटक आहे. हा सिद्धांत त्यांच्या राजकारणाचा पाया अर्थात गुरुकिल्ली असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच जर लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच आपणास लाभतील. मात्र लोकशाही मेली तर आपला विनाश अटळ आहे. याची जाणीव करून दिली होती. डॉ. आंबेडकरांनी दलित वर्गाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय उत्थानासाठी स्वाभिमानी चळवळ चालवल्यामुळे जनतेने त्यांना भावपूर्वक मानपत्र अर्पण केले होते. त्यावर उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी शिक्षित व्हा, चळवळ करा (लढा उभारा), संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका. असा पंचसुत्री सल्ला दिला होता. तसेच महिला परिषदेत बोलताना स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. असे स्पष्ट केले होते. सदरील परिषदेला २० हजार महिला, ५० हजार पुरुष व ५ हजार समता सैनिक दलाचे सदस्य शिस्तीत उपस्थित होते. या सर्व बाबीचा विचार करून ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता सदरील विषयावर कार्यशाळेच्या माध्यमातून प्रासंगिक सविस्तर चर्चा करीत आहोत. विस्ताराने समजून घेण्यासाठी या विषयावर लिहिलेला सविस्तर लेख दै. प्रबुद्ध भारत, दै. तुफान क्रांती, दै. निळे प्रतीक, दै. महावृत्त, दै. घटनेचा शिल्पकार, विचार क्रांती न्यूज पोर्टल यांनी आज प्रकाशित केला आहे. ते आपण समजून घ्यावे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना एड. जयश्री निकम सोनवणे म्हणाल्या की, जिथे मतदारांचा आवाज हा सत्ताधाऱ्यांपेक्षा जास्त असतो त्यालाच लोकशाही म्हटले पाहिजे. माध्यमांनी आपली भूमिका निष्पक्षपणे पार पाडली पाहिजे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी केवळ उद्योगपती, राजकारणी व व्यापारी एकत्र आल्यास शक्य होणार नाही. त्याकरिता समाज जीवनातील सामान्य जनतेला सामावून घ्यावे लागेल. जिथे लोकशाहीत प्रश्न विचारणे, सत्य बोलणे हे देशद्रोह ठरेल तिथे लोकशाही जिवंत कशी काय राहील? करिता महिलांची साक्षरता वाढवून सक्षमीकरण केलं पाहिजे जेणेकरून चळवळीत त्यांचा सहभाग वाढेल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विचारमंचामुळे व्यक्त होण्याची संधी प्राप्त झाली आहे. याचा लाभ अर्धांगिनी स्मिता किशोर पाटील यांनाही व्हावा म्हणून मी आज त्यांना कार्यशाळेला घेऊन आलो आहे. अर्थात घरातील भाषणच तुमच्या समोर उभे केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयोजित केलेल्या सदरील सभेला २० हजार महिला उपस्थित होत्या. आजच्या परिस्थितीत चळवळीसाठी २० महिला सुद्धा एकत्र येत नाहीत. आज केवळ दोन महिला उपस्थित आहेत. ही शोकांतिकाच नव्हे काय? महिलांचा सहभाग वाढला तर येणाऱ्या पिढीवर चांगले संस्कार होण्याची शक्यता आहे. उच्च ध्येय साध्य करण्यासाठी महत्त्वाकांक्षी असले पाहिजे. कुटुंबापुरते जीवन जगणे हे शेणातल्या किड्याप्रमाणे जीवन जगण्यासारखे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा समाज प्रगतीकडे वाटचाल करीत असतो. याचे भान ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. नाकर्तेपणा हा दैववादाचा पाया आहे. म्हणून आपण कर्मवाद स्वीकारला पाहिजे आणि सत्कर्म करीत राहिले पाहिजे.


याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, भारताचे संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे म्हणजे लोकशाही होय. प्रतीक पंचशील म्हणाले की, भारताचे संविधान लागू होऊन ७५ वर्षे झालीत तरी मात्र अपेक्षेप्रमाणे बदल होताना दिसत नाही. ज्या लोकांना लोकशाहीचा फायदा मिळाला आहे ते टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तर इतर जन मात्र समाप्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. करिता आपण लोकशाही मूल्याच्या संवर्धनासाठी कार्यरत राहिले पाहिजे. ड. विशाल अवचार म्हणाले की, विषय लोकशाहीच्या संबंधाने असल्यामुळे सत्तेवर येणारी माणसं त्यांच्या जाहीरनाम्यात काय लिहीत असतात? याची आपण तपासणी केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानवी समाजासाठी भारताचे संविधान लिहिलेले असताना अज्ञानापोटी अनेक मंडळी त्यांना दलितांचे उद्धारकर्ते, पुढारी असे म्हणतात. आज लोकशाही हा मुद्दा आपल्या देशापुरता मर्यादित राहिलेला नसून तो जागतिक झालेला आहे. महिला आधुनिकीकरणाकडे वळत असल्या तरी समाजकारणाचे काय? करिता त्यांनी समोर येऊन समाजात समाजवाद रुजवीला पाहिजे. एड. सचिन आगरकर म्हणाले की, एक स्त्री शिकली तर घर पुढे नेऊ शकते, म्हणून मुलींना शिक्षण दिले पाहिजे. स्मिता किशोर पाटील म्हणाल्या की, वीस वर्षापासून किशोर पाटील साहेब आपल्या विचारावर ठाम आहेत. आता मात्र त्यांना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने एक मंच मिळाला आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी तर आभार साधू आनंद यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम, एड. इंजिनीयर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, एड. जयश्री निकम सोनवणे, साधू आनंद, एड. विशाल अवचार, एड. सचिन आगरकर, राहुल मेश्राम, अशोक मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्री संत शिरोमणी नामदेव महाराज पायरीचे दर्शन

## संत नामदेव महाराजांच्या पायरी येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाआरती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री संत नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत नामदेव पायरीचे दर्शन घेतले. श्री संत नामदेव महाराजांच्या पायरीचे विधिवत पूजन करून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. तसेच श्री संत चोखामेळा समाधीचे व श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शनही मुख्यमंत्र्यांनी घेतले.

यावेळी मुख्यमंत्री महोदयांचा मंदिर समितीच्यावतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, सर्वश्री आमदार समाधान आवताडे, अभिजीत पाटील, गोपीचंद पडळकर,विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे सदस्य , आचार्य तुषार भोसले, संत नामदेव महाराज यांचे वंशज, श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे अध्यक्ष महेश ढवळे तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

**मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे, श्री संत चोखामेळा समाधीचे घेतले दर्शन**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. संतांचे जीवन प्रेरणादायी असून त्यांच्या जीवनकार्यातून आपल्याला विचारच नाही तर जीवनाचा मार्गही गवसतो. संत नामदेवांनी भागवत धर्माला वैश्विक धर्म केले आणि वारकरी विचाराला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवले. वारकरी संप्रदायात त्यांचे कार्य महान होते. अशा संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचले पाहिजे, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**विठ्ठल मंदिरात व्हीआर दर्शन सुविधेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन**
**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती व व्हर्च्युअल वर्ल्ड यांच्या संयुक्त विद्यमाने व्ही आर दर्शन सुविधा**

विठ्ठलाची महापूजा आणि विविध रूपे सर्वसामान्य भाविकांना पाहता यावीत यासाठी विठ्ठल मंदिरात वीआर दर्शन सुविधेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. गॉगलद्वारे देवाची विविध रूपे आता देशभरातील भाविकांना पाहायला मिळणार आहे. यापूर्वी उज्जैन आणि काशी विश्वेश्वर या देशातल्या दोन ठिकाणी अशा पद्धतीची सुविधा उपलब्ध आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे भक्तनिवास व शहरातील इतर ठिकाणी भाविकांना देवाच्या पूजा व्हीआर गॉगलद्वारे पाहता येणार आहे. अल्प शुल्क असलेल्या या सुविधेमुळे भाविकांना थेट देवाच्या गाभाऱ्यात उभे राहून समक्ष पाहिल्याचा आभास निर्माण होणार आहे. वर्षभरात विठुरायाच्या केवळ मोजक्याच महापूजा होतात, तुलनेत अनेक भाविकांना या महापूजेस उपस्थित राहण्याची इच्छा असल्याने या गॉगलच्या माध्यमातून या महापूजेचा आनंद भाविकांना घेता येणार आहे.

# अल्पावधितचं वागदरी पाटी ते नळदुर्ग रोडचे डांबरीकरण उखडले: गुत्तेदाराचा खिसा भरला शासनाचा कोट्यावधी निधी मातीत गेला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग ते अक्कलकोट रोडवरील वागदरी पाटी ते नळदुर्ग रोडचे नव्याने केलेले डांबरीकरण अल्पावधीतचं जागो जगी उखडले असून लवकरचं येरे माझ्या मागल्या म्हणण्याची वेळ येते की काय असे चित्र निर्मान झाले असून याकमी गुत्तेदाराचा, कामिशन वाल्यांचा खिसा भरला आणि शासनाचा कोट्यावधी निधी मातीत गेला असे म्हणटले तर वावगे ठरणार नाही.

या बाबत माहिती असी की दहा वर्षापूर्वी नळदुर्ग ते अक्कलकोट या राज्य मार्गाचे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २६५ मध्ये रूपांतर होऊन दोन पदरी मोठा सिमेंट रोड बनविण्याचे काम जलद गतीने सुरू करण्यात आले होते. त्यात काही शेतकऱ्यांनी शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यतून जमीनीचा मावेजा मिळवा म्हणून जागो जागी या सिमेंट रस्त्याचे काम आडविले व न्यायप्रविष्ठ केल्याने ज्या ठिकाणी रस्ता आडविला होता. त्या ठिकाणी मोठमोठे खडडे पडून या रस्त्यावरील वहातूक व्यवस्था संपूर्ण खोळंबली होती.तब्बल सात आठ वर्षे हा त्रास जनतेनी सोसला होता.शेवटी शेतकरी आणि शासन यांच्यात समन्वयाने जिथे काम रखडले तिथे पूर्वीच्या राज्य मार्गा प्रमाणे डांबरीकरण करून वहातूक व्यवस्था सुरळीत करण्याचा तोडगा निघाला. त्या करिता शासनाने कोट्यावधी निधी मंजूर केला. त्यानुसार वागदरी पाटी ते नळदुर्ग रखडलेल्या आणि उखडलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करून फक्त तिन चार महिने ही झाले . नाहीत. तरी नव्याने केलेले डांबरी करण वागदरी पाटी ते नळदुर्ग कडे जाणारा रस्ता पाटी पासून हाकेच्या अंतरावर नव्याने किलेले डांबरीकरण पूर्णतहा उखडले आहे. पुढे गणेश खीळा नळदुर्ग पर्यंत जागो जागी नव्याने केलेले डांबरीकरण उखडून खड्डे पडत आहेत. पावसाळ्यात हे डांबरीकरण पूर्ण पणे उखडण्याची शक्यता आहे.पुढे या रोडवरून ऊस वहातुक सुरु झाली की रोडची अत्यंत दुरावस्था होऊन परत येरे माझ्या मागल्या म्हणण्याची वेळ आल्यावाचून राहन नाही.

तेंव्हा शासनाने' वेळीचं याकडे लक्ष देवून संबधित गुत्तेदार व कार्यकारी अभियंता यांच्यावर योग्य ती कारवाई करून नव्याने पुन्हा एकदा या रोडचे डांबरीकरण करून या रोडवरील वहातूक व्यवस्था सुरळीत करावी असी मागणी जनतेतून होत आहे.



# पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी समाजासाठी दिलेले योगदान वंदनीय : मुकुंद पत्की

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट: पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी बहुजन समाजाच्या झोपडीपर्यंत ज्ञानगंगा पोचविली. त्यासाठी महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेची स्थापना केली. संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक व सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून वंचित, उपेक्षित व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून हन्नूर व अक्कलकोट या ठिकाणी शिक्षणाची सोय केली. शेतकऱ्यांसाठी पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्य केले. शेतकरी शेतमजूर यांना माफक दरात कर्ज मिळावे म्हणून शासन दरबारी प्रयत्न करून त्यांच्या विकासात योगदान दिले. म्हणूनच त्यांचे कार्य वंदनीय आहे असे प्रतिपादन संस्थेचे संचालक मुकुंद पत्की यांनी केले.

**मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम**

**दरम्यान पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त वरिष्ठ महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी सहभागी झाले होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, समन्वयक मलकप्पा भरमशेट्टी यांची प्रमुख उपस्थित होती.**

महर्षी विवेकानंद समाज कल्याण संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक कै.पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या दहाव्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर मल्लिनाथ कल्याणशेट्टी, भीमराव साठे, राचप्पा वागदरे, संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन मसुती, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर एक पेड मा के नाम, स्वच्छता अभियान स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूर्यकांत रूगेयांनी केले, सूत्रसंचालन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार निशिगंधा कोळी यांनी मानले. या कार्यक्रमास बापूजी निंबाळकर, खिरप्पा गवंडी, शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे,अकरीम मुल्ला, सेमी विभागाचे दिगंबर जगताप आदी उपस्थित होते.

# बीए थर्ड इयर विद्यार्थ्यांचा ऍडमिशनचा प्रश्न सम्यक विद्यार्थी आंदोलने तात्काळ सोडवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सी. बी. खेडगी महाविद्यालयात बीए भाग तीन या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना ऍडमिशन घेत असताना काही अडचणी येत होते त्यामुळे विद्यार्थ्यांनी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे यांच्याशी संपर्क साधला.

त्यानंतर रविराज पोटे यांनी महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांची भेट घेतली आणि या विषयावर चर्चा केली आणि तात्काळ विद्यार्थ्यांचे ऍडमिशन संदर्भातील अडचणी सोडवण्यात आले. याप्रसंगी सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता इंजिनीयर रविराज पोटे, साहिल कांबळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# डुबेरे जनता विद्यालयात गुरु-शिष्य पुण्यतिथी साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मवीर काकासाहेब वाघ व सहकार महर्षी माधवराव बोरस्ते यांची गुरु -शिष्य पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार ,पी.आर. करपे, सोमनाथ गिरी, विद्या ठाकरे ,रेखा खंडीझोड, वरिष्ठ लिपीक राणी शिंदे, रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले म्हणाले की, कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी बहुजनांच्या मुलांकरता शिक्षणाची गंगोत्री य खेड्या- पाड्यांमध्ये पोहोचवली. तसेच त्यांच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती दिली. तसेच त्यांनी शिष्य सहकार महर्षी माधवराव बोरस्ते यांच्या कार्याची माहिती दिली. प्रणव पावसे,ईश्वरी गुरव या विद्यार्थ्यांनी कर्मवीर काकासाहेब वाघ व सहकार महर्षी माधवराव बोरस्ते यांच्या कार्याचा परिचय करून दिला.इयत्ता आठवी तु-अ च्या वर्गशिक्षिका सीमा गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले.सूत्रसंचालन प्रणाली गुरव हिने तर आभार गायत्री शिंदे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता विद्यालयातील सर्व शिक्षक ,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


**भातसा धरण ओव्हर फ्लो...नदी काठच्या गावांना सावधानतेचा इशारा**

**आमदार दौलत दरोडा यांच्याकडून पाहणी**

# मुंबईकरांसाठी महत्त्वाची खूष खबर....पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भातसा नगर(शहापूर) : प्रफुल्ल शेवाळे : शहापूर तालुका धरणांचा तालुका म्हणून ओळखला जातो... आणि याच तालुक्यातील तानसा, वैतरणा, भातसा या धरणानमधून मुंबईला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.. सगळ्यांच धरण क्षेत्रात उत्तम रित्या पाऊस झालेला आहे. मागील काही दिवसापासून भातसा परिसरात सुद्धा सतत पाऊस होतंआहे.यामुळे धरणामध्ये पाण्याचा येवा वाढला आहे आणि याचं धर्तीवर पाण्याची पातळी समतोल राखण्या करिता धरणाचे दरवाजे उघडावे लागतात.आज सकाळी शहापूर विधानसभा आमदार दौलत आणि त्यांच्या पत्नी सौ. गीताताई दरोडा यांच्या हस्ते नारळ, साडी चोळीचा मान देत विधिवत रित्या धरणाचे जलपूजन करण्यात आले. सकाळी १०:३४ मिनिट च्या सुमारास भातसा धरणाचे दोन दरवाजे ०.२५ मी. ने उघडण्यात आले आहेत.भातसा धरण वाहू लागल्याने मुंबईकर नक्कीच सुखावले असणार यात शंका नाही. आजची पाण्याची पातळी १३८ मी म्हणून नोंद करण्यात आली होती. भातसा धरण पूर्ण भरून वाहण्याची क्षमता ही १४२ मीटर इतकी आहे. यावेळी आमदार दरोडा यांनी म्हटलं आहे की धरणाचे दरवाजे उघडल्यानंतर वाहत्या पाण्याचा साठा वाढणार आहे. नदी काठच्या गावांनी नागरिकांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. पाऊसाचा जोर आणखीन वाढला आणि धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागले तर पूर परिस्थिती निर्माण होउ शकते. अशा वेळी तात्काळ तहसीलदार, पोलीस प्रशासन आणि आम्हाला संपर्क करा. आमच्या सर्वांकडून पुढील खबरदारीचा उपाय म्हणून उपाय योजना, अमलात आणल्या जातील.





भातसा धरण अभियंता रवींद्र पवार यांनी दि. २२ जुलै रोजी शहापूर, भिवंडी, कल्याण महसूल विभाग आणि संबंधित पोलीस प्रशासन ला सूचना पत्रक जारी केले आहे. भातसा धरणातून पाण्याचा विसर्ग प्रवाहित करणे आणि नदी काठच्या गावांना सावधान तेचा इशारा संबंधित पत्रा द्वारे देण्यात आला आहे. यावेळी भातसा धरण कार्यकारी अभियंता रवींद्र पवार, राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश चिटणीस डी. के. विश सर, तालुका अध्यक्ष मनोहर सासे, जिल्हा सोशल मीडिया सेल अध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, युवक तालुका अध्यक्ष दिनेश चंदे,तालुका सरचिटणीस सतीश सासे, तालुका युवक उपाध्यक्ष प्रतीक गायकवाड आणि माध्यम प्रतिनिधी, भातसा धरण जलसंपदा विभाग कर्मचारी उपस्थित होते.